आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

१८ डिसेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वप्नातही अनादर करणार नाही असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं निवेदन

- उरणजवळ प्रवासी बोटीला झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती

- ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक सुधीर रसाळ यांना मराठीसाठी तर मुकेश थाळी यांना कोकणीसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

- बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित

**आणि**

- भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

शाह यांनी काल राज्यसभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी आज प्रचंड गदारोळ केला. सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यावर लगेचच काँग्रेस, द्रमुक आणि डाव्या पक्षाच्या सदस्यांनी शहा यांचा निषेध करणाऱ्या घोषणा द्यायला सुरुवात केली. दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु राहिल्याने सभापती ओम बिरला यांनी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं. नंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही काँग्रेस, द्रमुक, राजद, आमआदमी पार्टी आणि इतर विरोधी सदस्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विधानाचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांसाठीच अतिशय आदरणीय आहेत असं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की काल अमित शहा बाबासाहेबांबाबत अतीव आदरानेच
बोलले होते. गदारोळ चालूच राहिल्याने अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं. नंतरही गदारोळ चालूच राहीला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

नागपुरात हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान सभागृहात हा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी केला. पण हे वक्तव्य राज्यसभेतलं असल्यानं त्यावर इथं चर्चा शक्य नसल्याचं सांगत सत्ताधाऱ्यांनी त्यावर आक्षेप घेतला.

**<><><><><>**

काँग्रेसने आतापर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अनेकदा अपमान केला असून आपली कृत्यं काँग्रेसला आता लपवता येणार नाहीत असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन आज संसदेत गदारोळ झाला त्या संदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर प्रतिक्रीया दिली आहे. काँग्रेस सत्तेवर असताना दलित

समुदायातल्या अनेकांची हत्या झाली असा आरोप त्यांनी केला असून अनुसूचित जाती जमातींसाठी काँग्रेसने काहीही केलं नाही असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यघटनेचे शिल्पकार असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनादर आपण स्वप्नातही करणार नाही, काल राज्यसभेत, आपण केलेल्या भाषणाबाबत काँग्रेस वस्तुस्थितीचा विपर्यास करत आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात बातमीदारांशी बोलत होते.

काँग्रेस पक्ष, बाबासाहेब आंबेडकर, आरक्षण, राज्यघटनेचा विरोधक असल्याचा आरोप त्यांनी केला. बाबासाहेब आंबेडकरांना निवडणुकीत पराभूत करण्यासाठी काँग्रेसनं त्यांच्या विरोधात मोहीम राबवली होती, तसंच आणीबाणी लादून काँग्रेसनं सर्व घटनात्मक मूल्यांचं उल्लंघन केलं होतं, असं ते म्हणाले.

संसदेसारख्या देशाच्या सर्वोच्च लोकशाही मंचावर चर्चा करताना तिला वस्तुस्थिती आणि सत्याचा आधार असला पाहिजे, असंही शहा म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय न्यायवैद्यक पायाभूत सुविधा विकास उपक्रमांतर्गत पुण्यासह आणखी ६ ठिकाणी केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यास सरकारनं मंजुरी दिली आहे, अशी माहिती केंद्रीय गृहराज्य मंत्री बंदी संजय कुमार यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसंच उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांची भेट घेतली. शेतकऱ्यांचे प्रश्न आणि डाळिंब लागवडीतली आव्हानं यावर चर्चा केली असून कोणत्याही राजकीय विषयावर चर्चा झाली नाही, असं पवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेटवे ऑफ इंडियावरून एलिफंटाला निघालेल्या बोटीला उरण इथं झालेल्या अपघातात अंदाजे ७ ते ८ जण मृत्युमुखी पडल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. नौदल किंवा तटरक्षक दलाची बोट बहुदा चालकाचं नियंत्रण सुटल्यानं अतिशय वेगाने प्रवासी बोटीला धडकल्याचं व्हिडिओत दिसत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मदत वेळेवर पोहोचल्यानं बहुतेकांना वाचवण्यात यश आल्याचं सांगून अपघातात प्राण गमावलेल्या आणि जखमी झालेल्यांना शासनातर्फे योग्य मदत देण्याचं आश्वासनही फडणवीस यांनी दिलं.

दरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिकेनं दिलेल्या माहितीनुसार या बोटीत एकंदर ११० जण होते. यापैकी दोन प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, तर चौघांची प्रकृती गंभीर आहे. अपघातातल्या जखमींवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहितियिक समीक्षक सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ‘विंदांचे गद्य रूप’ या पुस्तकासाठी रसाळ यांना हा पुरस्कार मिळाला आहे. एक लाख रुपये रोख, ताम्रपट, आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. हा पुरस्कार येत्या ८ मार्चला दिल्लीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात येईल.

पुरस्काराबद्दल रसाळ यांनी आकाशवाणीशी बोलताना आनंद व्यक्त केला….

**बाईट- सुधीर रसाळ (२० सेकंद)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुधीर रसाळ यांचं अभिनंदन केलं आहे.

साहित्य अकादमी ने २१ भाषांमधल्या यंदाच्या पुरस्कार विजेत्यांची नावं आज जाहीर केली. त्यात ८ कवितासंग्रह, ३ कादंबऱ्या, २ लघुकथा, ३ ललितलेख, ३ साहित्य समीक्षा, एक नाटक आणि एका संशोधनात्मक साहित्यकृतींचा समावेश

आहे. आकाशवाणी पणजी केंद्रातले सेवानिवृत्त वृत्तनिवेदक मुकेश थळी यांच्या ‘रंगतरंग’ या कोकणी ललितलेख संग्रहालाही पुरस्कार जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला.

भारताचा पहिला डाव आज २६० धावांवर आटोपल्यानंतर ऑस्ट्रेलियानं दुसऱ्या डावात ७ बाद ८९ धावा करुन डाव घोषित केला. त्यामुळं भारतासमोर विजयासाठी २७५ धावांचं आव्हान होतं. भारताच्या दुसऱ्या डावात केवळ २ षटकं आणि १ चेंडूचा खेळ झाल्यावर पंचांनी अपूऱ्या प्रकाशामुळे खेळ थांबवला. त्यानंतर पावसानं हजेरी लावल्यानं खेळ पुन्हा सुरू होऊ शकला नाही. अखेरीस सामना अनिर्णित राहिल्याचं घोषित केलं गेलं.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात १५० धावा करणारा ट्रॅव्हिस हेड याला सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं. या मालिकेतला चौथा सामना, येत्या २६ डिसेंबरपासून मेलबर्न इथं सुरू होणार आहे. आत्तापर्यंत झालेल्या तीन सामन्यांमध्ये दोन्ही संघांनी प्रत्येकी एका सामन्यात विजय मिळवल्यानं, मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

**<><><><><>**

भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विन यानं आज ३८व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा कसोटी सामना संपल्यानंतर त्यानं आपण निवृत्त होत असल्याचं जाहीर केलं. या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात अश्विननं भारताचं प्रतिनिधीत्व केलं होतं. या सामन्यात त्यानं ५३ धावांत १ गडी बाद केला. हाच त्याच्या कारकिर्दीतला अखेरचा कसोटी क्रिकेट सामना ठरला.

६ नोव्हेंबर २०११ रोजी वेस्ट इंडिजविरोधात दिल्ली इथं झालेल्या कसोटी सामन्यात पदार्पण केल्यानंतर, अश्विननं आतापर्यंत १०६ कसोटी क्रिकेट सामन्यांत भारताचं प्रतिनिधीत्व करत ५३७ बळी घेतले आहे. कसोटी क्रिकेटमध्ये अनिल कुंबळे पाठोपाठ भारताच्या वतीनं सर्वाधिक बळी घेणारा दुसऱ्या क्रमांकाचा गोलंदाज आहे. याशिवाय त्यानं कसोटी क्रिकेटमध्ये ६ शतकं आणि १४ अर्धशतकंही झळकावली आहेत. त्यानं ११६ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमध्ये १५६ तर टी ट्वेंटी सामन्यांमध्ये ७२ बळी घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही आपण व्यावसायिक टी ट्वेंटी क्रिकेट खेळत राहणार असल्याचं अश्विननं जाहीर केलं आहे.

//<><><><><>//